# गॅस्ट्रोवर इंजेक्शनविरहित होमिओपॅथिक उपचार



## होमिओपॅथी
चिकित्सा व उपचार
डॉ. अमरसिंह निकम

जुलाब व उलट्यांचा त्रास प्रत्येकाने एकदा तरी आयुष्यात अनुभवलेला असतो. पोट आणि आतडे यांना जिवाणू किंवा विषाणूंमुळे दाह निर्माण होऊन मळमळ, उलटी व जुलाब होऊ लागतात. असा जंतुसंसर्ग दूषित अन्नपदार्थ किंवा दूषित पाणी, अस्वच्छता यामुळे होतो.

या जुलाब-उलट्यांमुळे शरीरातील पाणी कमी होऊन डिहायड्रेशन होण्याची संभावना असते. हा धोका लहान मुलांमध्ये सर्वांत जास्त असतो. भारतासारख्या प्रगतिशील देशामध्ये दारिद्र्यरेषेखालील मुलांमध्ये अस्वच्छतेच्या कारणामुळे अतिसार होऊन मृत्यू पावण्याचे प्रमाण जास्त आहे.

**कारणे :-** १. जिवाणू - रोटा व्हायरस, नोरोव्हायरस, ॲस्ट्रोव्हायरस इ. जिवाणूंमुळे गॅस्ट्रो होऊ शकतो. रोटाव्हायरसचा संसर्ग हा लहान मुलांमध्ये जुलाबासाठी जास्त प्रमाणात कारणीभूत आहे. २. विषाणू - कॅम्पोयलेबॅक्टर जेज्युनी, साल्मोनेला, शिगेला, इकोलाय हे विषाणू या आजारासाठी कारणीभूत ठरतात. जिवाणू किंवा विषाणूंनी दूषित झालेले अन्न रूम टेम्परेचरला तसेच बराच काळ राहिले तर त्याच अन्नसेवनातून विषबाधा होते. कच्चे अन्नपदार्थ, पोल्ट्रीचे, माशांचे पदार्थ, अंडी, पाश्चराइज न केलेले दूध, फळे व भाज्यांचे ज्यूस या अन्नघटकांतून असा जंतुसंसर्ग होतो. ३. परजीवी घटक जसे की, जिआरडिया लॅम्बलिमा, एन्टिमिबा यांमुळे ही जुलाब-उलट्यांचा त्रास होतो. ४. या आजाराचे परिवहन दूषित पाणी, जवळच्या व्यक्तीच्या वस्तूंशी संपर्क, पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे, लहान मुलांमध्ये दूध पिण्यासाठी बॉटलचा वापर केल्यामुळे उद्‌भवू शकतो.

**लक्षणे :-** जंतुसंसर्ग झाल्यानंतर १२ ते ७२ तासांत लक्षणे दिसून येतात आणि एक आठवड्याने कमी होतात. १. ताप येणे, डोके दुखणे, स्नायुदाह होणे. २. पोटात कळ मारून जास्त प्रमाणात जुलाब होणे. ३. उलट्या होणे ४. भूक मंदावणे. ५. वजन घटणे. ६. त्वचेवर थंडगार घाम येणे. ७. रक्तदाब कमी कमी होत जाणे. बोटांची टोके पांढरट पडणे. ८. श्वसनाची गती वाढणे. काही विषाणूंच्या संसर्गानंतर जुलाब-उलट्यानंतर जुनाट व्याधी जसे की, सांधेदुखी, गुलिअन बारी सिंड्रोम, प्लेटलेटचे प्रमाण कमी होणे, किडनीचे कार्य निकामी होणे, लहान मुलांमध्ये आकडी येणे असे आजार उद्‌भवू शकतात.

जुलाब-उलटयांद्वारे शरीरातील पाणी कमी होते. रुग्ण ताबडतोब शॉकमध्ये जाऊ शकतो. डिहायड्रेशनची धोकादायक चिन्हे म्हणजे जुलाब खूप दिवस न थांबणे, जुलाबाद्वारे रक्त पडणे, गळून गेल्यासारखे वाटू लागते. चक्कर येणे, भ्रमिष्ठपणा येणे, मळमळणे, तोंडाला कोरड पडणे, लहान मुलांच्या डोळ्यांतून रडताना अश्रू न येणे, आठ तासांहून अधिक काळ लघवी न होणे, लघवीचा कलर गडद पिवळा किंवा चॉकलेटी होणे. डोळे खोल खोबणीत जाणे, टाळू आत जाणे, अतिप्रसंगी व्यक्ती बेशुद्ध होऊ शकतो.

निरोगी व्यक्तीच्या शरीरात पाण्याचे संतुलन सतत राखले जाते. घाम, श्वास, मलमूत्र विसर्जन, उलटी, ताप याद्वारे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. तहानेद्वारा ही गरज भागवली जाते. जेव्हा ही गरज काही कारणांमुळे जसे की, अतिसार, मधुमेह वगैरे आजारांनी भागविली जात नाही. त्या वेळेस शरीरातील पाण्याचे व क्षारांचे प्रमाण कमी होते. यालाच आपण डिहायड्रेशन असे म्हणतो.

डिहायड्रेशनमुळे रक्तदाब खालावतो, बोटांची टोके पांढरट पडतात, त्वचेची लवचिकता कमी होते, हृदयस्पंदने वाढतात. त्यामुळे किडनी, मेंदू यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा कमी झाल्यामुळे किडन्या निकामी होऊ शकतात किंवा मेंदूला कायमची इजा होऊ शकते.

**निदान :-** १. लक्षणांवरून या आजाराचे निदान करता येते. काही काही वेळा संडासाच्या नमुन्याची तपासणी करण्यात येते. २. लहान मुलांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होते. ३. याचबरोबर किडनी फंक्शन टेस्ट व शरीरातील क्षारद्रव्यांची तपासणी करण्यात येते.

**काय करावे :-** १. भरपूर प्रमाणात उकळून गार केलेल्या पाण्याचे सेवन करावे. २. आहार हलका असावा. ३. फळांचे सेवन करू नये. ४. जुलाब-उलट्या थांबतच नसतील तर ताबडतोब उपचार घ्यावेत. ५. भरपूर विश्रांती घ्यावी. ६. मीठ, साखर, पाण्याचे किंवा ओ.आर.एस. पावडरचे सेवन करावे.

**केस** - ही एक दीड वर्षाच्या मुलाची केस आहे, ज्याला ४ ते ५ दिवसांपासून ताप येत होता आणि ३ दिवसांपासून जुलाब होऊ लागले.

**त्याच्या तक्रारी :-** १. रोज दुपारच्या वेळी ताप चढणे. तापात डोळे, हात-पाय, तळवे गरम होणे. तापात तहान कमी प्रमाणात लागणे. २. तीन दिवसांपासून सतत जुलाब होणे. पिवळसर, पाण्यासारखे घाणेरडा वास येणारे जुलाब दिवसातून १० ते १२ वेळा होणे. त्याला काहीच खायची इच्छा नव्हती. काहीही खाल्ले की लगेच जुलाब होत होते. दुपारच्या वेळी जास्त करून जुलाब होणे.

**३. लघवी कमी प्रमाणात होणे. दिवसातून दोनदाच लघवी होणे.**

**विशेष माहिती :-** १. खाणे पूर्णपणे बंद झाले होते. २. स्तनपानाची आवड, दुधाची नावड, दुधाने त्रास होणे. ३. तहान कमी प्रमाणात लागणे. ४. डोक्यावर भरपूर प्रमाणात घाम येणे. ५. झोपेत दचकणे. ६. तोंडात बोट घालण्याची सवय. ७. दात येण्याचा कालावधी. ८. उश्ण प्रकृती.

**स्वभाव :-** सध्याच्या त्रासामुळे तो खूप चिडचिडा झाला आहे. आईने सांगितले सध्या त्याला मीच सतत बरोबर असावेसे, त्याला उचलून घ्यावेसे त्याला वाटते. तो कोणाकडे राहत नाही. त्याला खाली पडलेल्या वस्तू तोंडात घालण्याची आणि पाण्यात खेळण्याची आवड होती.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्वः** - १. आईने सतत उचलून घ्यावेसे वाटणे. २. पिवळसर, पातळ जुलाब होणे. ३. दिवसा तक्रारींमध्ये वाढ. ४. दात येण्याचा कालावधी. ५. दुधाची नावड व दुधाने त्रास होणे. ६. डोक्यावर, तळहात व पायांवर उष्णता. ७. उष्ण प्रकृती.

**प्रतिसाद :-** वरील लक्षणांवरून मी त्यांना होमिओपॅथिक औषध सुरू केले व माझ्या कन्सल्टिंगमध्येच थांबायला सांगितले. एका तासातच त्याचा ताप उतरला. तो पाणी पिऊ लागला. त्याने लघवी केली. त्यांना घरी औषध घेऊन पाठवले व दुसऱ्या दिवशी फेरतपासणीसाठी बोलावले. दुसऱ्या दिवशीसुद्धा त्याने लघवी केली होती. थोड्या प्रमाणात तो खाऊ लागला. जुलाबाचे प्रमाण कमी झाले. पुन्हा त्याला ताप चढला नाही. तो थोडाफार खेळू लागला. दोन ते तीन दिवसांतच तो पूर्ण बरा झाला. कुठल्याही सलाइन, इंजेक्शन, प्रतिजैविकांशिवाय. त्याला डिहायड्रेशनमुळे लहान मुलांच्या डॉक्टरांनी तातडीने ॲडमिट होऊन सलाईन लावण्यास सांगितले होते. अशा अशा पेशंटमध्ये पाणी, ग्लुकोज व इलेक्ट्रोलाइट्स शरीरातील क्षारांचे प्रमाण पूर्ववत करण्यासाठी तातडीने सलाइनचा उपयोग केला जातो. अन्यथा पेशंटच्या जिवास अत्यल्प वेळेत धोका निर्माण होऊन तत्काळ मृत्यू ओढावू शकतो.

**केस -2**

एक ५२ वर्षांची मधुमेहाचा आजार असलेली महिला आदल्या रात्री हॉटेलमध्ये मासे खाल्ल्यानंतर जुलाबाने हैराण झालेली होती. जेवणानंतर ६ तासांतच तिला पातळ, पाण्यासारख्या घाण वास येणारे जुलाब दहा-दहा मिनिटांनी होत होते. ती माझ्याकडे आली तेव्हा तिला १० ते २० जुलाब झाल्यामुळे तिचा रक्तदाब खूप खालावलेला ९०/ ६० mm of Hg होता. तिला अशक्तपणा व चक्कर येत होती. तहानसुद्धा कमी झालेली होती.

तिचा आजार लक्षात घेऊन मी तिला माझ्या रुग्णालयात भरती केले व एकच औषध परंतु सातत्याने दिले व कुठलीही सलाईन न देता, दोन ते तीन तासांतच तिचे जुलाब कमी झाले. तिचा रक्तदाब हळूहळू वाढू लागला. संध्याकाळी तिला फ्रेश वाटू लागले. रात्रीचा आहार हलकाच घेण्यास सांगून मी त्यांना दुसऱ्या दिवशी भेटायला बोलावले. त्या वेळेस रक्तदाब पूर्ववत १२०/८० mm of Hg झालेला होता.

होमिओपॅथिक औषध घेतल्याने शरीरांतर्गत असलेल्या पचनसंस्थेतील आजारपेशी तरतरीत होऊन कार्यान्वित होतात. शरीरांतर्गत अन्नातील घटक, क्षार, साखर यांचे प्रमाण त्वरित संतुलित करतात. शरीरांतर्गत रक्तातील पाण्याची पातळी सुधारल्याने रक्तपुरवठा सुरळीत होतो आणि सर्व शरीर ताजेतवाने होते. विशेष म्हणजे कुठलेही सलाईन उलटी-जुलाबाचे इंजेक्शन न देता. पचनसंस्थेतील पेशीसमूहाकडून हे कार्य केले जाते. त्यामुळेच अत्यंत जलद आणि कोमल पद्धतीने शरीराची पुनर्स्थापना केली जाते.

आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल,
हनुमान मंदिराजवळ, स/नं. ३०९/१/२, शिवाजी चौक, पिंपरी गाव, पुणे -१७
फोन नंबर - ०२०-२७४१२१९७/२७४१२५४९

## संक्षिप्त

### तालीम संघाच्या उपाध्यक्षपदी बराटे

**। पुणे : प्रतिनिधी**



पुणे राष्ट्रीय तालीम संघाच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी हिंदकेसरी अमोल बराटे यांची निवड करण्यात आली आहे. अध्यक्ष दामोदर टकले, कार्याध्यक्ष गुलाबराव सोनवणे, सरचिटणीस गोरखनाथ भिकुले यांच्या हस्ते अमोल बराटे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. पुणे राष्ट्रीय तालीम संघाच्या विश्वस्तांची सभा होऊन कार्यकारिणीचे पदाधिकारी म्हणून सन २०१६ ते २०१९ या कालवधीसाठी ही निवड करण्यात आली आहे. पुणे शहरात प्रथमच वरिष्ठ उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

# वातावरणाचा आरोग्यावर परिणाम

**। पुणे : प्रतिनिधी**

दुसऱ्या दिवशी देखील सोमवारी दुपारपासूनच शहरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे वातावरणात गारवा आला आहे. अचानक बदललेल्या या वातावरणाचा आरोग्यावरही विपरीत परिणाम जाणवू लागला आहे. अचानक झालेल्या पावसाने थेट परिणाम आरोग्यावर होत आहे. परिणामी व्हायरल फिव्हरच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. कडाक्याच्या थंडीची प्रतीक्षा असताना नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा संपला, तरीही हवी तशी थंडी पडलेली नाही. दिवसा उन्हाचा चटका तर कधी ढगाळ वातावरणामुळे तापमान कमी असूनही उकाडा असल्याचा अनुभव येतोय.

सोमवारी सकाळपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. दुपारी तीन-साडेतीनच्या सुमारास पावसास सुरुवात झाली. हा पाऊस सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होता. सलग दोन दिवस झालेल्या पावसाने शहरात विद्यार्थी व कामासाठी आलेल्या लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. सायंकाळी शाळा सुटल्या, त्यावेळी विद्यार्थ्यांनाही भिजतच घर गाठावे लागले. अगोदरच थंडी वाढत असताना त्यात पावसाची भर पडल्याने त्याचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. वातावरणातील बदलांमुळे ताप, सर्दीसारखे आजार वाढत असताना ऐनवेळी पावसाने हजेरी लावल्याने यात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वातावरणातील थंडी वाढली होती. दीपावली सणा दरम्यानही हलक्या अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने बळीराजा चिंतेत आहे. ऐन हिवाळ्यातही ऊन, पाऊस आणि थंडी यांचा अनुभव येत आहे. यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून, रुग्णसंख्येत वाढ झाली. स्वाइन फ्लू, डेंग्यूसारख्या आजारांचा आधीच धोका असताना, पावसामुळे 'स्वाइन फ्लू व डेंग्यूला सध्याचे पोषक असल्याचे तज्ज्ञांनी सांगीतले.

> **पाणी उकळून प्यावे**
>
> **ढगाळ वातावरण आणि पावसामुळे साथीच्या आजारांच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. त्यामुळे पाणी उकळून प्यावे, हा नियम सर्वांनीच पाळावा. बाहेरचे अन्न टाळून घरातील ताजे अन्न खावे. विशेषतः पाणी भरपूर प्यावे. प्राथमिक बाबींवर नागरिकांनी भर द्यायला हवा.**
>
> **- डॉ. गिरीश सहस्त्रबुद्धे, फिजिशियन**

# पंचगुणी लसीकरणाला सुरुवात

**। पुणे : प्रतिनिधी**

धनुर्वात, डांग्या खोकला, घटसर्प, कावीळ आणि 'एच वर्गातील एन्फ्लूएन्झा या पाच प्रकारच्या आजारांपासून सर्व बाळांचे संरक्षण करण्यासाठी शहरात 'पंचगुणी' लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली. या मोहिमेचे उद्‌घाटन महापौर दत्तात्रय धनकवडे यांच्या हस्ते पालिकेचे कमला नेहरू रुग्णालय येथे करण्यात आले.

**महापौरांच्या हस्ते उद्‌घाटन**

महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये ही लस उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच आतापर्यंत तोंडातून देण्यात येणाऱ्या पोलिओच्या डोसाऐवजी आता इंजेक्शनमधून ही लस देण्यात येईल, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे देण्यात आली. यावेळी नगरसेविका संगीता तिकोने, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. एस. टी. परदेशी, उपआरोग्य अधिकारी डॉ. अंजली साबणे उपस्थित होते.

पोलिओचे देशातून उच्चाटन करण्यात यश आले आहे. भविष्यात या आजाराचा रुग्ण आढळू नये, यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी महापालिकेतर्फे प्रभावी अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. या मोहिमेंतर्गत राज्य शासनाकडून पालिका आरोग्य विभागाला ५८ हजार लसींचा पुरवठा करण्यात आला आहे. ० ते ६ वर्षांपर्यंतच्या प्रत्येक मुला-मुलीला विविध टप्प्यांमध्ये पाच वेगवेगळ्या लसी देण्यात यायच्या. यामध्ये पोलिओचा डोस दिला जात होता. त्यामुळे पोलिओचे निर्मूलन शक्य झाले. ही लस पूर्णपणे मोफत असून, पंचगुणी लस शहरात सर्व ठिकाणी पोहोचविण्यात आली आहे. त्याचे प्रशिक्षणदेखील पूर्ण झाले आहे.

## आपलं व्यासपीठ

### ध्यास घ्यावा सर्वोत्तमाचा

आपणापैकी प्रत्येकजण स्त्री असो वा पुरुष आपापले काम नित्यनेमाने पार पाडतच असतो. पण सर्वांचेच काम उत्तम असेलच असे नाही. आपल्यापैकी पुष्कळजण फक्त पाट्या टाकण्याचेच धोरण अवलंबत असतात, पण काहीजण मात्र आपले काम इतर सर्वांच्यापेक्षा सरस अन् सर्वोत्तम कसे होईल, याचाच ध्यास घेत असतात. एखादा हाडाचा म्हणजेच जातिवंत संगीतकार, गाण्याची चाल मनाजोगी होईतोपर्यंत एकाच गाण्याला पुन्हा पुन्हा चाली लावतच राहातो. तीच गोष्ट कवीची, गीतकाराची, तसेच मूर्तिकाराचीही असते. कंपन्या, कारखानेदेखील आपल्या उत्पादनांची क्वालिटी सर्वोत्कृष्ट ठेवण्याचाच प्रयन करीत असतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांनीदेखील जे जे उत्तम उदात्त अन् महन्मंगलाचाच संदेश दिलेला आहे. पाश्चात्त्य विचारवंतांनीही सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट याचा आग्रह धरला होता. तात्पर्य, आपली ड्यूटी मग ती नोकरीतील असो, धंदा-उद्योग व्यवसायातली असो अन्य कुठल्याही क्षेत्रातील असते अत्यंत प्रामाणिकपणे एकनिष्ठ राहूनच बजावली पाहिजे. वर्क इज वर्कशिप किंवा डिव्होशन ड्यूटी इज द हायस्ट फॉर्म ऑफ वर्किंग ऑफ गुड याच धोरणाचा अवलंब करून सर्वोत्तमाचाच ध्यास घेतला पाहिजे.

**-अशोक कोर्टीकर, हडपसर**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

# हेमकमल लाइफ केअरचे उद्‌घाटन

**। पुणे** : चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सेव्हंथ डे ॲडव्हेंटिस्ट मेडिकल ट्रस्टतर्फे अद्ययावत हेमकमल लाइफ केअरचे उद्‌घाटन डी. बी. जैन ग्रुपचे प्रमुख देविचंद निबजिया यांच्या हस्ते करण्यात आले.

सॅलिसबरी पार्क येथील पुणे ॲडव्हेंटिस्ट हॉस्पिटल कार्यरत आहे. या हॉस्पिटलतर्फे नुकतेच हेमकमल लाइफ केअरचे नूतनीकरण करण्यात आले. याप्रसंगी हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. फिलीप वर्थन, विजय निबजिया, भरत निबजिया, राकेश निबजिया, मानव, मिली, याना व निबजिया परिवार, ट्रस्टचे एझरस लकरा व ज्युआन प्रेस्टॉल, श्रीनाथ भिमाले, अचल जैन, अनिल कंदानी आदी उपस्थित होते.

# डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी मेळावा

**। पुणे : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये राहूनही आरबीएसके मार्फत स्थानिक मुलांना व महिलांना आरोग्यविषयक सेवा पुरविल्या जातात. अनेक अडचणींवर मात करत बहुतांशी योजना डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांनी सफल करुन दाखवल्या आहेत. असे असतानाही आरबीएसके अंतर्गत काम करणाऱ्या डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी २५ नोव्हें. रोजी राज्यव्यापी मेळाव्याचे आयोजन केले आहे.

या मेळाव्यामध्ये आरबीएसके अंतर्गत लहान मुलांना चांगल्या आरोग्य सुविधा देताना येणाऱ्या अनुभवांची देवाणघेवाण करून प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणारे अडथळे व त्यावरील उपायांसाठी चर्चा केली जाणार आहे. तसेच या योजनेमधील सर्व कर्मचाऱ्यांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांवरील उपाययोजनेविषयी चर्चा व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सकाळी ९ ते ४ दरम्यान आरबीएसके राज्य संघर्ष समितीने आयोजित केलेल्या 'स्वास्थ्य बालकांचे...भवितव्य कर्मचाऱ्यांचे' हा राज्यव्यापी मेळावा लोखंडे कामगार भवन, आंबेडकर चौक, पिंपरी, पुणे येथे होणार आहे. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती गायत्री सिंग, प्रा. अजित अभ्यंकर यांची असणार आहे.

















